आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक : 11.11.2026 **वार : बुधवार**

भाऊबीज

भावाबहिणीच्या नात्याला दृढ करणारा दिवाळीच्या सणातला भाऊबीजेचा दिवस आज सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. कार्तिक शुद्ध द्वितीय अर्थात यमद्वितीया, या दिवशी भावान बहिणीच्या घरी जाण्याची प्रथा असून भावाच्या दीर्घायुष्यासाठी बहिणीन भावाला औक्षण करण्याची परंपरा आहे.

भाऊबीज - स्वान फाऊंडेशन

सणासुदीच्या काळातही कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना आज पुणे शहर पोलीस आयुक्तालयात, भाऊबीज निमित्त भेटवस्तू देऊन सणाचा आनंद द्विगुणित करण्यात आला. स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनच्या वतीने गेल्या सहा वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाला अतिरिक्त पोलीस आयुक्त तेजस्वी सातपुते, पोलीस उपायुक्त गोहर हसन, शंकर ककडे, प्रसिद्ध उद्योगपती पंकज डहाणूकर, डॉ. इफ्तार पठाण, स्वान फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे आणि अभिजित मोडक उपस्थित होते.

पाणीकपात रद्द

पुणे महापालिकेन उद्या, गुरुवारी १२ नोव्हेंबरला असणारी नियोजित पाणीकपात रद्द केली असून सलग दुसऱ्या गुरुवारी कपात होणार नाही. त्यामुळं पुणेकरांना उद्या नियमित पाणी मिळणार आहे. दिवाळीच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये, म्हणून हा निर्णय घेतला असून नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, आवाहनही पाणीपुरवठा विभागान केलं आहे.

कचऱ्याचं प्रमाण वाढलं

दिवाळीच्या काळात पुणे शहरातील कचऱ्याचं प्रमाण वाढलं आहे. सामान्य दिवसांत दररोज २७शे ते २८शे टन कचरा जमा होतो. सध्या हे प्रमाण थेट ३१शे टनांवर पोहोचलं आहे. दिवाळी निमित्तान घरांची साफसफाई, जुन्या वस्तूंची विल्हेवाट, सजावट आणि फटाक्यांच्या कचऱ्यामुळे ही वाढ झाल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

विद्यावर्धिनी

पुणे महापालिकेच्या विद्यावर्धिनी आदर्श शाळांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी. विद्युत व्यवस्थेचं नूतनीकरण प्रस्तावांना स्थायी समितीने मान्यता दिली आहे. पाचही परिमंडळांतील कामांसाठी नऊ कोटी ६३ लाख ५० हजार ८६४ रुपयांचा खर्च येणार असून, स्मार्ट बोर्ड, संगणक प्रयोगशाळा आणि विद्यार्थिनींसाठी पिंक रूमला आवश्यक वीज जोडण्या दिल्या जाणार असून वर्गांमध्ये नवीन वायरिंग, एलईडी दिवे, पंखे आणि प्रोजेक्टर, ध्वनियंत्रणा आणि पाण्याच्या पंपांसाठीही विद्युत सुविधा सुधारल्या जाणार आहेत.

फेरविचार

दुष्काळी परिस्थिती आणि नागरिकांचे मूलभूत प्रश्न लक्षात घेऊन पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या आयोजनाचा फेरविचार करावा, अशी मागणी माजी आमदार मोहन जोशी यांनी केली आहे. जानेवारीत स्पर्धेचं दुसरं पर्व होणार आहे. मात्र, त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करणं सध्याच्या परिस्थितीत योग्य आहे का, असा सवाल जोशी यांनी उपस्थित केला आहे.

एसआरएचे अधिकार

पुणे महापालिकेतले माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि प्रशांत बधे यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पत्र देऊन, एस आर ए चे अधिकार आयुक्तांकडे देण्याची मागणी केली आहे. 'झोपडपट्टीसदृश' क्षेत्रांच्या नावाखाली, बेकायदा टीडीआर तयार केल्याचा आणि महापालिकेचं आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप, त्यांनी पत्रात केला आहे.

लाँग मार्च

पुण्यातून नागपूर विधानभवनापर्यंत ७६३ किलोमीटरची संविधान सन्मान लाँग मार्च पदयात्रा काढण्यात येणार आहे. मूलनिवासी मुस्लिम मंचाच्या पुढाकारान १५ नोव्हेंबरला सकाळी अकरा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून पदयात्रेला सुरुवात होईल. धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि अल्पसंख्याकांचे घटनात्मक अधिकार या मागण्यांसाठी ही पदयात्रा आयोजित केली, असल्याची माहिती मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार यांनी दिली आहे.

मराठी राज्य नाट्य स्पर्धा

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीन आयोजित, ६५ व्या हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेच्या पुणे केंद्रावरील प्राथमिक फेरीला येत्या सोमवारपासून सुरुवात होणार आहे. भरत नाट्य मंदिर येथे ही स्पर्धा रंगणार असून, सोमवारी स्वच्छंद या संस्थेच्या 'लेबल' या नाटकाने स्पर्धेचा शुभारंभ होईल. स्पर्धेदरम्यान दररोज दुपारी १ वाजता आणि सायंकाळी ७ वाजता नाटकांचे प्रयोग सादर केले जाणार आहेत.

हवामान

पुणे आणि शहर परिसरात, आज आकाश निरभ्र असून किमान तापमान 14.3 तर कमाल तापमान 32 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही हवामानात फारसा बदल नसल्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता, आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!